# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

# छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

• संपादक •
**डॉ. शिवाजी हुसे**

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

**MAH MAR 34737/13/1/2009-TC**

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

## कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक

[भाग-२]

● संपादक ●

**डॉ. शिवाजी हुसे**

● अतिथी संपादक ●

**डॉ. सर्जेराव जिगे डॉ. यशवंत सोनुने**

● संपादक मंडळ ●

| | | |
|---|---|---|
| डॉ. सुभाष बागल | डॉ. ताहेर पठाण | डॉ. दिलीप बिरुटे |
| डॉ. सुभाष शेकडे | डॉ. रामचंद्र झाडे | डॉ. प्रेमला मुखेडकर |
| डॉ. एकनाथ शिंदे | डॉ. दत्तात्रय डुंबरे | डॉ. रंजना कदम |
| | डॉ. राज मुसणे | डॉ. सुखदेव इघारे |

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,

कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | छत्रपती शिवराय : एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व...<br>(व्यक्तित्व विकास वं राष्ट्र उभारणीसाठी शिवचरित्र हा एक उत्तम पर्याय)<br>- प्रा. नंदू वाळुबा गवळी | १ - ३ |
| २. | छत्रपती शिवाजी महाराजांची महसूल व्यवस्था<br>- प्रा. डॉ. चिताडे एन. पी. | ४ - ६ |
| ३. | छत्रपती शिवाजी महाराज : साहित्यातील प्रतिमा आणि इतिहास<br>- प्रा. डॉ. गणेश मालटे | ७ - ९ |
| ४. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरप्रणीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची मीमांसा<br>- प्रा. प्रफुल्ल एम. राजुरवाडे | १० - १२ |
| ५. | छत्रपती शिवाजी महाराज - कर्तृत्व<br>- शैलेश सुरेंद्र सोनोने | १३ - १७ |
| ६. | छत्रपती शिवाजी महाराजांची व्यवस्थापनशास्त्रविषयक भूमिका<br>- प्रा. अविनाश अशोक सोनवणे | १८ - २० |
| ७. | छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासनविषयक भूमिका<br>- प्रा. डॉ. केशव तिडके | २१ - २३ |
| ८. | छत्रपती शिवाजी महाराजांचे न्यायक्षेत्रातील योगदान<br>- प्रा. डॉ. प्रकाश निवृत्ती चौधरी | २४ - २७ |
| ९. | छत्रपती शिवाजी महाराजांची धार्मिक सहिष्णुता<br>- डॉ. सुधाकर वि. भुयार | २८ - ३० |
| १०. | छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक, आर्थिक व व्यापारविषयक धोरण<br>- प्रा. डॉ. प्रियंका खोसे | ३१ - ३४ |
| ११. | छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तित्व आणि कर्तृत्व<br>- डॉ. ज्योती आर तहाणे | ३५ - ३७ |
| १२. | छत्रपती शिवाजी महाराजांची धार्मिक सहिष्णूता<br>- डॉ. गीतांजली मोटे | ३८ - ४१ |
| १३. | छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श व्यापारी धोरण<br>- डॉ. मधूकर विठोवा जाधव | ४२ - ४६ |
| १४. | छत्रपती शिवाजी महाराजांची व्यवस्थापनविषयक भूमिका व निर्णय<br>- डॉ.  किशोर गिरीश नवले | ४७ - ५१ |
| १५. | छत्रपती शिवाजी महाराजांची धार्मिक सहिष्णुता<br>- प्रा. साळवे सचिन | ५२ - ५३ |

| | | |
|---|---|---|
| १६. | शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. रमा पांडे | ५४ - ५६ |
| १७. | छ. शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. सारिका अशोकराव बुरगे | ५७ - ५९ |
| १८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. जनार्दन काटकर | ६० - ६३ |
| १९. | छत्रपती शिवाजी महाराज : साहित्यातील प्रतिमा आणि इतिहास<br>- प्रा. डॉ. अनुराधा रा. मुळे | ६४ - ६५ |
| २०. | छत्रपती शिवाजी महाराजांचे अलौकिकत्व<br>- प्रा. डॉ. मोहन राजाराम कापगते | ६६ - ७० |
| २१. | शिवरायांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. नीता मेश्राम (पाटील) | ७१ - ७४ |
| २२. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- पंढरीनाथ हरी मोकळे | ७५ - ७७ |
| २३. | छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक धोरण : एक अर्थशास्त्रीय अध्ययन<br>- प्रा. डॉ. अमोल गिरीधरराव आवंडकर | ७८ - ८२ |
| २४. | छत्रपती शिवाजी महाराजांची आरमारविषयक भूमिका<br>- प्रा. डॉ. नवनाथ येठेकर | ८३ - ८६ |
| २५. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- पूनम वाघ | ८७ - ८९ |
| २६. | शिवचरित्रात रामदास एक कपोलकल्पित कारस्थान<br>- प्रा. डॉ. सतीश रावसाहेब कदम | ९० - ९२ |
| २७. | छत्रपती शिवाजी महाराजांचा आर्थिक दृष्टिकोन<br>- डॉ. जयश्री आसाराम तळेकर | ९३ - ९४ |
| २८. | शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- गीता किसन इंगळे | ९५ - ९९ |
| २९. | छत्रपती शिवाजी महाराज : कर्तृत्व<br>- डॉ. दीपक गायकवाड | १०० - १०२ |
| ३०. | छत्रपती शिवाजी महाराजांचा आर्थिक दृष्टिकोन<br>- कानवडे अर्चना रामनाथ | १०३ - १०५ |
| ३१. | छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन आणि व्यवस्थापन<br>- डॉ. विवेक वि. नागभिडकर | १०६ - १०९ |
| ३२. | म. फुलेलिखित छत्रपती शिवाजीराजांचा पवाडा : आकलन आणि आस्वाद<br>- प्रा. डॉ. गोवर्धन मुळक | ११० - ११५ |

| | | |
|---|---|---|
| ३३. | छत्रपती शिवाजी महाराजांची इतिहासप्रसिद्ध सुरतेची लूट : एक दृष्टिक्षेप<br>- तेजस शांताराम रेवाळे | ११६ - ११९ |
| ३४. | छत्रपती शिवाजी महाराजांची व्यवस्थापनशास्त्रविषयक भूमिका<br>- अनिता आत्माराम पवार | १२० - १२४ |
| ३५. | छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचा आरमारविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. दराडे संभाजी सोपानराव व प्रा. ज्ञानेश्वर बाळासाहेब पादर | १२५ - १२८ |
| ३६. | महात्मा फुलेलिखित छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पवाडा<br>- डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे व डॉ. ललिता मानसिंग गोपाळ | १२९ - १३५ |
| ३७. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- प्रा . प्रदीप इन्सुलकर व प्रा. डॉ. भा. ना. गाडेकर | १३६ - १३९ |
| ३८. | शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. सौ. कुलकर्णी एस. एन. | १४० - १४१ |
| ३९. | शिवविचार – छत्रपती शिवाजी महाराजांची विचारधारा<br>- प्रफुल्लसिंग सुवर्णसिंग राजपूत व प्रा. डॉ. भा.ना. गाडेकर | १४२ - १४७ |
| ४०. | कृष्णराव अर्जुन केळूसकरलिखित क्षत्रिय कुलावतंस छत्रपती शिवाजी महाराज चरित्राची मीमांसा - डॉ. सहदेव शरद चव्हाण | १४८ - १५१ |
| ४१. | छत्रपती शिवाजी महाराजांचे : व्यक्तित्त्व<br>- प्रा. डॉ. ज्ञानेश्वर महादराव गाडे | १५२ - १५४ |
| ४२. | शिवकालीन खान्देशातील उद्योग व व्यापार : एक दृष्टिक्षेप<br>- प्रा. डॉ. ए. जी. सोनवणे | १५५ - १५८ |
| ४३. | शिवकालीन शस्त्रास्त्रे<br>- प्रा. डॉ. रमाकांत अंबादास चौधरी | १५९ - १६२ |
| ४४. | शिवकालीन बखर वाड्मय<br>- डॉ. रश्मी शेट्ये-तुपे | १६३ - १६५ |
| ४५. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- प्रा. डॉ. दिलीप सावंत | १६६ - १६८ |
| ४६. | शिवकालीन नाणी - एक अभ्यास<br>- प्रा. दिकोंडा रूपाली गोवर्धन | १६९ - १७१ |
| ४७. | हिंदवी स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तित्व व कर्तृत्वाचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास<br>- प्रा. डॉ. स्वाती रा. सरोदे | १७२ - १७५ |
| ४८. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर<br>- प्रा. डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावित | १७६ - १८२ |

| | | |
|---|---|---|
| ४९. | छत्रपती शिवाजी महाराज : व्यक्तित्व<br>- लहाने पंडित नाना | १८३ - १८७ |
| ५०. | शिवकालीन इतिहास लेखनातील राष्ट्रवादी प्रवाह<br>- प्रा. नाजीर पठाण | १८८ - १९२ |
| ५१. | श्री छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर वाङ्मय<br>- प्रा. डॉ. शत्रुघ्न फड | १९३ - १९६ |
| ५२. | शिवकालीन महाराष्ट्रातील सामाजिक व आर्थिक जीवन<br>- डॉ. भगवान डोंगरे | १९७ - १९९ |
| ५३. | स्वराज्याची स्थापना आणि शिवरायांचे सहकारी<br>- डॉ. गोविंद धोंडिराम उफाडे | २०० - २०२ |
| ५४. | छत्रपती शिवाजी महाराजांचा सामाजिक दृष्टिकोन<br>- श्यामसुंदर चमचे | २०३ - २०५ |
| ५५. | शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीचा डावपेच एक ऐतिहासिक अवलोकन<br>- डॉ. मंजूषा समर्थ | २०६ - २१० |
| ५६. | छत्रपती शिवरायांच्या प्रशासकीय व्यवस्थेचे अवलोकन : एक चिंतन<br>- डॉ. माया वानखेडे | २११ - २१५ |
| ५७. | छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती<br>- डॉ. देवयानी चव्हाण | २१६ - २१८ |
| ५८. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी चित्रपट<br>- अनुजा धनंजय मोरे | २१९ - २२१ |
| ५९. | छत्रपती शिवाजी महाराजांचा साहित्य, कला आणि संस्कृतीविषयक दृष्टिकोन<br>- प्रा. डॉ. प्रशांत रामदासजी राऊत | २२२ - २२४ |
| ६०. | मराठी ऐतिहासिक कादंबरी : छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व<br>- डॉ. प्रताप गायकवाड | २२५ - २२७ |
| ६१. | शिवशाहीतील आदर्श राजनीतीचा दिशादर्शक दस्तऐवज : आज्ञापत्र<br>- भांगे सारिका मनोहर | २२८ - २३१ |
| ६२. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक, समतावादी व पर्यावरणविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. गोविंद गायकी | २३२ - २३३ |
| ६३. | छ. शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था<br>- प्रा. इंगळे के. एम. | २३४ - २३५ |



# कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज



# छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती

- डॉ. देवयानी चव्हाण
सहयोगी प्राध्यापक
गो. से. अर्थ वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

भारतमातेच्या मुक्ततेचे आणि विशाल हिंदवी स्वराज्याचे स्वप्न उराशी बाळगून त्याचे बीजारोपण करणारा तेजस्वी महापुरुष म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. शिवरायांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचे नुसते स्वप्न पाहिले नाही, तर सत्यात उतरवण्यासाठी तन-मन-धनाने, अथक परिश्रम घेऊन आणि जिवाची बाजी लावून ते साध्य केले. स्वातंत्र्याचे ध्येय जर मूर्त स्वरूपात साध्य करायचे असेल, तर शत्रूशी सशस्त्र संग्राम करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही हे त्यांनी जाणले होते. प्रतिकूल परिस्थिती, शत्रू शतपटीने प्रबळ, अनुभवी प्रशिक्षित सैन्य, संपत्ती, शस्त्रास्त्रे, सैनिक हे सर्व शत्रूकडे असूनही शिवाजी महाराज डगमगले नाहीत. त्यांनी आपल्या प्रभावी युद्धतंत्राने महत्त्वाकांक्षेचे उत्तुंग शिखर सर केले. त्यांनी त्यांच्या गनिमी कावा या युद्धतंत्राचा वापर करून भवानी मातेच्या आशीर्वादाने स्वराज्य स्थापन केले. यात मुख्य डावपेच, बेसावध शत्रूवर अचानक हल्ला करून त्याची जास्तीत जास्त हानी करून शत्रू सावध होण्यापूर्वीच माघार घेतली जाते. असे अनेक छुपे हल्ले केल्याने शत्रूचे मनोधैर्य खच्ची होते. गनिमी काव्याचा वापर करून छोटे सैन्य मोठ्या सैन्याचा पराभव करू शकते. याच युद्धनीतीचा शिवाजीराजांनी वापर करून अवघ्या पस्तीस वर्षाच्या काळात आपल्या पराक्रमाच्या व मुत्सद्देगिरीच्या जोरावर हिंदवी स्वराज्य स्थापन केले. स्वराज्यासाठी ते संपूर्ण हयातभर लढत राहिले. स्वराज्यावर अनेक संकटे आली; पण शिवरायांनी प्रसंग पाहून आणि दूरवरचा विचार करून त्यांना तोंड दिले. शिवराय पराक्रमी होते तसेच थोर मुत्सद्दी होते. शक्ती कमी पडली तेव्हा शिवरायांनी युक्ती चालवली. त्यांच्यासारखा धाडसी आणि मुत्सद्दी राजा होणे नाही.

**संशोधन पद्धत -**

प्रस्तुत शोधनिबंधसाठी निरीक्षणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. यात तथ्य संकलनासाठी विविध दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला असून विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्राचा उपयोग करण्यात आला आहे.

**अध्ययनाचे उद्देश -**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीचा आढावा घेणे.

**आशय विश्लेषण -**

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यासाठी कोणकोणत्या युद्धनीतीचा कसा उपयोग केला. त्याविषयीच्या विचाराचा पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल.

**युद्धनीती म्हणजे काय? -**

काळ, वेळ, प्रसंग, भूप्रदेश, शत्रूपक्षातील सैनिक संख्या या सर्वांचा विचार करून कोणती युद्धपद्धती वापरायची ते ठरविणे म्हणजे युद्धनीती. शिवाजी महाराजांनी या सर्व गोष्टींचा विचार करूनच शत्रूशी युद्ध केली. त्यामुळे काही अपवाद वगळता जवळजवळ सर्वच ठिकाणी त्यांना यश येत गेले.

युद्धनीतीचे मुख्य तीन प्रकार आहेत.

१. गनिमी कावा युद्धनीती

२. प्रकाश युद्धनीती

३. कूट युद्धनीती

**गनिमी कावा युद्धनीती -**

शिवरायांना गनिमी कावा युद्धनीतीचे जनक मानले जाते. शत्रूची सैन्यसंख्या अधिक आहे, शत्रूकडील युद्धसामग्री आपल्यापेक्षा अधिक आहे. साधनाच्या बाबतीतही शत्रू वरचढ आहे. अशा परिस्थितीत शत्रूशी युद्ध करावे लागते तेव्हा आपली कमीत कमी हानी व शत्रूची अधिक हानी झाली पाहिजे. यासाठी गनिमी कावा युद्धनीतीचा उपयोग केला जातो. शत्रू बेसावध असताना घोडदळाने शत्रूसैन्याच्या फळीत मुसंडी

मारायची व शत्रूसेनेच्या फळीला खिंडार पडले की माघार घ्यायची, म्हणजे पळून जायचे. यामुळे शत्रूचा गोंधळ होतो, तसेच हा गोंधळ ओसरण्यापूर्वी एका तुकडीने शत्रूसैन्याच्या मागच्या तुकडीवर हल्ला करायचा. त्यामुळे शत्रूसैन्य आपला मोहरा बदलते. मागच्या आघाडीच्या रक्षणासाठी शत्रूसैन्याची हालचाल सुरू होते. अशा रीतीने शत्रूसेनेच्या संघटीत फळीत विस्कळीतपणा येतो. थोडक्यात, शत्रूवर लपून हल्ला करण्याच्या पद्धतीला गनिमी कावा युद्धनीती म्हणतात. पुरंदरला वेढा देण्यासाठी पुरंदरजवळ जो जयसिंगाच्या सेनेने तळ दिला होता त्यावर मराठ्यांच्या सैन्याने या प्रकारचे हल्ले केले होते. तसेच सर्जाखानाच्या सेनेवरदेखील असेच हल्ले केले होते.

**प्रकाश युद्धनीती -**

दोन्ही बाजूंचे सैन्य, देश व काळ याची घोषणा करते. लढण्यासाठी रणभूमीवर परस्परांच्या समोर युद्ध करण्यासाठी म्हणून येतात. अशाप्रकारचे युद्ध म्हणजे प्रकाश युद्धनीती होय.

**कूट युद्धनीती -**

जेव्हा आपले सैन्य शत्रूच्या सेनेपेक्षा संख्येने जास्त असते, गुणाच्या बाबतीतही श्रेष्ठ असते आणि शत्रूसेनेत फितुरी झालेली असली पाहिजे, तेव्हा जे युद्ध केले जाते. त्यास कूट युद्धनीती म्हटले जाते.

शत्रू संकटात आहे, शत्रू नदीचा उतार ओलांडतो आहे, अशा वेळीच शत्रूवर आक्रमण करावयाचे. शत्रू त्याला अनुकूल असलेल्या जागी ठाण मांडून बसला असेल आणि ती जागा किंवा ते क्षेत्र आपल्याला प्रतिकूल असेल, तर काहीही करून शत्रूला आपल्याला अनुकूल असलेल्या क्षेत्रात वा जागी येण्यास भाग पाडावे आणि मग त्याच्याशी युद्ध करावे. शिवरायांनी अफजलखानास अशा ठिकाणी येण्यास भाग पाडले की, ते ठिकाण शिवरायांना अनुकूल होते. ते क्षेत्र म्हणजे प्रतापगडाच्या माचीजवळचे क्षेत्र मराठ्यांसाठी अनुकूल होते.

एकाच जागी शत्रूचे सैन्य जमा झालेले असेल तेव्हाच सैन्यावर हत्तींना सोडायचे. त्यामुळे शत्रूचे सैन्य पांगते. शत्रू आघाडीवर चाल करून येत असेल, तर त्याच्या पिछाडीवर हल्ला करायचा. शत्रूने मोहरा बदलला की कधी उजव्या, तर कधी डाव्या बाजूवर हल्ला करायचा, तर शेवटी आघाडीवर हल्ला करायचा. अशा प्रकारच्या हल्ल्यामुळे शत्रूसैन्य पांगते. अशी पांगापांग झालेल्या शत्रूसैन्याचा पराभव करणे कठीण जात नाही. शिवरायांनी उमराणीच्या युद्धात हेच तंत्र वापरले होते. ('शिवरायांची युद्धनीती' पृष्ठ क्रमांक २०७, २०८ लेखक सच्चिदानंद शेवडे व दुर्गेश परूळकर)

आपला पराभव झाला आहे असे भासवायचे नि माघार घ्यायला सुरुवात करायची. असे केले की शत्रू पाठलाग करतो. पाठलाग करणारी तुकडी मुख्य सेनेपासून वेगळी पडते. मग आपला मोहरा पालटायचा, कुडाळच्या लढाईत शिवरायांनी याच तंत्राचा वापर केला होता.

कूट युद्ध करण्यासाठी उपयुक्त स्थळे म्हणजे मरुस्थळी असलेले किल्ले, वनदुर्ग काट्याकुट्यांनी युक्त अरण्ये, पाणथळ जमीन, गिरीशिखर, उंच-सखल जमीन असलेला भूभाग अशी स्थळे कूटयुद्धनीतीने जिंकता येतात. अशा स्थळासाठी दिवसा लढाई करणे योग्य नाही. रात्रीच्या वेळी अशा स्थळावर हल्ला करणे अधिक चांगले. शिवरायांनी या तंत्राचा वापर पन्हाळगडावर मराठे चढले ती फाल्गुन वद्य त्रयोदशीची रात्र होती, तर माघ वद्य नवमीच्या अंधाऱ्या रात्री तानाजी कोंढाण्यावर दोरखंडाच्या साहाय्याने वर चढून गेला. प्रतापराव, आनंदराव यांनी बहलोलखानाच्या छावणीला वेढा दिला ती रात्रीचीच वेळ होती. बसनूरच्या आरमारी युद्धात शिवरायांनी उजाडण्याच्या अगोदरच नगरात प्रवेश केला होता कुडाळच्या युद्धात मराठी सैन्य रात्रभर चालले नि खवासखानावर उजाडल्याबरोबर हल्ला केला.

शिवराय हे प्रतिकूलतेला अनुकूलतेत रूपांतरित करणारे द्रष्टे व धाडसी राजे होते. अंतर्गत शत्रू आणि बाहेरचा शत्रू या दोघांशी लढावे लागते. त्यांचा अडथळा दूर करावयाचा तर साम, दाम, दंड भेद अशा चार प्रकारच्या उपायांचा वापर प्रसंगाप्रमाणे करावा लागतो. पुरंदरचा किल्ला, जावळी ही ठिकाणे शिवरायांनी भेद नि दंड यांचा वापर करून घेतली.

युद्धाचे आणखी दोन प्रकार सांगितले आहेत.

१. संरक्षक युद्ध

२. आक्रमक युद्ध

शत्रू चाल करून येईपर्यंत वाट पाहणे हे संरक्षक युद्ध होय. अशा युद्धात ज्या स्थळी आणि परिस्थितीत शत्रूचे आक्रमण होईल त्याला तोंड द्यावे लागते. अशा युद्धातला जय-पराजय शत्रूच्या हाती असतो; कारण या युद्धात सर्व सूत्रे शत्रूच्या हाती असतात. आक्रमक युद्धात युद्ध कुठे करायचे, केव्हा करायचे कशा पद्धतीने करायचे हे सर्वस्वी आपल्या हाती असते. म्हणजे जो आक्रमक युद्धाचा वापर करतो त्याच्या हाती हे सर्व असते. आक्रमण करण्यापूर्वी शत्रूचे बल किती आहे याचा विचार झालेला असतो. त्या प्रमाणात व तशा पद्धतीची

योग्य ती सिद्धता होऊनच युद्धाला तोंड फुटते. लाभ-हानीचा पूर्ण विचार करूनच शिवरायांनी आक्रमक चढाया केल्या.

इ.स. १६६५ मधील पुरंदरची लढाई सोडली तर युद्धात रणभूमी निवडण्याचे स्वातंत्र्य शिवरायांनी नेहमी स्वतःकडे ठेवले. स्वतःच्या भूप्रदेशावर शक्यतो युद्ध होऊ द्यायचे नाही हे पथ्य शिवरायांनी पाळले. रणभूमीच्या परिसरात राहणाऱ्या लोकांना युद्धाची झळ पोहोचतेच. कोणत्याही पक्षाचा विजय झाला तरी हानी जनतेची होते.

शिवरायांनी आपल्या स्वराज्याला नवनवीन मुलूख जोडण्याचा सातत्याने प्रयत्न केला. त्यातसुद्धा एक प्रकारची शिस्त होती. एका युद्धातला विजय हा दुसऱ्या युद्धाची नांदी ठरली. विजयाचा उत्साह आपल्या सैन्यातून मावळू दिला नाही. शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेच्या काळातले पहिले दशक स्वराज्याची उभारणी व स्थैर्य यात गेले. सन १६५६ ते १६७९ या दोन तपांच्या काळात झालेल्या युद्धात सुसूत्रता आढळते. आदिलशहाच्या व पोर्तुगीज यांच्या ताब्यातील काही भाग सोडला, तर उत्तर कोकणात शिवरायांनी आपले राज्य प्रस्थापित केले. यावरच समाधान न मानता १६६० मध्ये राजापूरमधली इंग्रजांची वखार उद्ध्वस्त केली.

रायबागला आदिलशहाच्या सेनेला पाणी पाजले. १६६१ ला शिवरायांनी उंबरखिंडीत मुघलांची कोंडी करून त्यांना शरण येण्यास भाग पाडले. शाहिस्तेखानाला धडा शिकवून आपला वचक बसविला. हे सर्व युद्धनीतीच्या बळावर! सन १६६४ मध्ये सुरतेवर धाड टाकली व सततच्या युद्धाने रिकामा झालेला खजिना भरला. १६७० मध्ये मुघलांचा कोंढाणा किल्ला जिंकला. या विजयाने मराठ्यांची कीर्ती सर्वत्र पसरली व शत्रूला हादरा बसला.

एकंदरीत शिवाजी महाराजांच्या युद्धनीती कौशल्याच्या संदर्भात पुढील मुद्दे उल्लेखनीय आहेत.

- शत्रूला शक्यतो न मारता दहशत बसवून विजय मिळविणे.
- गनिमी काव्याने युद्ध करणे.
- शत्रूचे सैन्यसंख्याबळ किती आहे हे पाहून युद्धाची दिशा ठरवणे.
- वेळप्रसंगी आपले सैन्यबळ कमी असेल तर माघार घेणे किंवा तह करणे.
- शत्रूच्या गाफीलपणाचा फायदा घेऊन अचानक हल्ला करणे.
- एकाच वेळी अनेक शत्रूंशी लढा न लढणे.
- अन्न, पाणी, चारा बंद करून शत्रूचा कोंडमारा करणे.
- युद्धात स्त्री, ब्राह्मण, लहान मुले तसेच वृद्ध यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय न करणे.
- शत्रूचा धर्म आणि धर्मग्रंथ यांची विटंबना न करणे.
- शेतकऱ्यांच्या पिकाची नासाडी न करणे.
- नि:शस्त्र शत्रू शरण आल्यास त्यास जीवदान देणे.
- शौर्य गाजविणाऱ्यांचा यथोचित सन्मान करणे.

शत्रूचे सैनिक शरण आल्यास त्यांना जीवदान देऊन त्यास आपल्या सैन्यात दाखल करून घेऊन पुढे त्यांच्यामध्ये पराक्रम दिसून आल्यास त्यांना मानाची पदे व बढत्या देणे. शिवरायांनी स्वकर्तृत्वावर जिद्द, चिकाटी, अविश्रांत परिश्रम, धाडस, बुद्धिचातुर्य इत्यादी गुणांच्या साहाय्याने बहुजन समाजाच्या कल्याणासाठी स्वराज्य निर्माण केले, यातच त्यांचे श्रेष्ठत्व दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची -**


१) 'रयतेचा राजा शिवछत्रपती' - डॉ. पी. एस. जगताप

२) 'शिवरायांची युद्धनीती' - डॉ. सच्चिदानंद शेवडे, दुर्गेश परूळकर

३) 'छत्रपती शिवाजी महाराज' - कृ. अ. केळूसकर

४) 'राजा शिवछत्रपती' - बाबासाहेब पुरंदरे

५) 'शिवप्रताप' - उमेश सणस


६) 'शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची शिवचरित्र कथनमाला' - संकलन गजानन खोले

७) 'शिवकालीन महाराष्ट्र' - अ. ग. कुलकर्णी

८) 'शिवराय' - प्रा. नामदेव जाधव

९) 'श्री राजा शिवछत्रपती' भाग १ व २ - गजानन भास्कर मेहेंदळे


◆◆◆◆◆



MAH MAR 34737/13/1/2009-TC
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



कुळवाडी–भूषण पवाडा गातो भोसल्याचा ।
छत्रपती शिवाजीचा ।।ध्रु०।।
लंगोटयांस देई जानवीं पोषींदा कूणब्याचा ।
काल तो असे यवनांचा ।।
शिवाजीचा पिता शहाजी पुत्र मालोजीचा ।
असे तो डौल जहागिरीचा ।।
पंधराशें एकूणपन्नास साल फळलें ।
जुन्नर तें उदयासी आलें ।।
शिवनेरी किल्ल्यामध्यें बाळ शिवाजी जन्मलें ।
जिजीबाईस रत्न सांपडलें ।।
हातापायांचीं नखं बोटं शुभ्र प्याजी रंगीलें ।
ज्यांनीं कमळा लाजिवलें ।।
वरखालीं टिर्याख पोटर्याय गांठी गोळे बांधले ।
स्फटिकापरि भासले ।।
सान कटी सिंहापरी छाती मांस दुनावलें ।
नांव शिवाजी शोभलें ।।

– महात्मा जोतिराव फुले

